# इंग्रजी आणि प्रगति

डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे

स्वभाषेच्या ऐवजी इंग्रजी वापरली तर... नव्हे तरच... आपली उन्नती होऊ शकते अशी आज भारतात सर्वत्र मान्यता आहे. म्हणून गेली ५०वर्षे आम्ही स्वभाषेंचा तिरस्कार करून इंग्रजीचा जप केला यामुळे काय फायदा झाला याचा मागोवा घेणे आवश्यक आहे.

'इंग्रजीची कास सोडून स्वभाषांचा आग्रह धरला असता तर आपण अरबस्तान आफ्रिकेसारखेच मागासलो असतो' असे माझे एक मित्र मला म्हणाले. तेव्हा मी वरील देशांच्या मानाने भारत कितपत प्रगत आहे हे पाहण्यासाठी 'जागतिक क्रमांक' च्या ताज्या अंकातील आकडे पाहिले. विकासाचे मापन करताना सरासरी उत्पन्न, आयुर्मान व साक्षरतेचे प्रमाण यांचा विचार करीत असतात. त्याप्रमाणे देशातील किमती लक्षात घेऊन ठरविलेल्या दरडोई उत्पन्नात सौदी अरेबियात क्रमांक २७, साऊथ आफ्रिकेचा ४५ व भारताचा ९३ आहे. साक्षरतेत सौदी अरेबियाचा १२०, आफ्रिकेचा ९७ व भारताचा १३६ वा क्रमांक आहे.

साक्षरता व उत्पन्न यांचे क्रमांक व आयुर्मानात मृत्यूसमयीचे वय यांची तुलना केली आहे. कारण आधारभूत ग्रंथात याच प्रकारे आकडे दिले आहेत.

एकूण अरबस्तान व आफ्रिका ही भारतापेक्षा सर्वच बाबतीत प्रगत आहेत. तेव्हा 'आपण अरबस्तान / आफ्रिकेसारखेच मागासलेले होऊ' ही भाषा भारताच्या तोंडी हास्यास्पद आहे.

हे आकडे दाखविल्यावर माझ्याशी वाद करणारे गृहस्थ आपला पवित्रा बदलून म्हणाले.

'या देशाची प्रगती देखील इंग्रजीमुळेच झाली आहे.' हे कितपत खरे आहे हे पाहण्यासाठी मी या देशातील इंग्रजीच्या स्थानाबद्दल माहिती शोधली. ती अशी आहे.

Fact Book मध्ये. 'सौदी अरेबियात माध्यमिक शाळात 'थोडेसे' इंग्रजी शिकविले जाते' असा उल्लेख आहे. बाकी राज्यकारभार व सारे शिक्षण अरेबिक मधूनच होते. साऊथ आफ्रिकेमध्ये इंग्रजांचेच राज्य होते. पण तेथे विज्ञानाचे शिक्षण धरून सर्व शिक्षण आफ्रिकानीझमध्ये होते असे जॉन गुन्थरने लिहिले आहे. राज्यकारभारात देखील भारतात हिंदीला आहे त्यापेक्षा आफ्रिकांनीझला पुष्कळच जास्त स्थान आहे.

ही स्थिति स्वराज्यानंतर इंग्रजीचे सार्वभौमत्व ५६वर्षे चालल्यानंतर होती. ५६वर्षे हा कालखंड देशाच्या इतिहासात लहान नाही. साऱ्या भारतावर इंग्रजांचे राज्य अवघे; १००वर्षे होते. पण तरी त्याने भारताचा इंग्रजपूर्व इतिहास जणू पुसून टाकला आहे. १८७०पासून जपानचा राष्ट्रोत्थानाचा प्रयत्न सुरू झाला. पाहता पाहता अवघ्या ३०वर्षात म्हणजे १९०४ साली हा मागासलेला 'एशियाटिक' देश रशियासारखा युरोपातील अग्रगण्य देशाला धूळ चारण्याइतका समर्थ झाला.

**चीन, जपान व इंग्रजी**

जपानची प्रगति इंग्रजीमुळे झाली असा भारतात नेहमी प्रचार करण्यात येतो. पण जपानमध्ये राज्यकारभार व शिक्षण यांचे माध्यम इंग्रजी कधीच नव्हते. इंग्रजीचा आश्रय जपानला समृध्द बनविण्यासाठी केला गेला. जपान्यांचे उन्मूलन करण्यासाठी नव्हे. इंग्रजी ग्रन्थ समजावेत व त्यांच्या आधारे जपानीत ग्रंथरचना करता यावी एवढाच इंग्रजी शिकविण्यात उद्देश होता. शिवाय इंग्रजीबरोबर इतरही जागतिक भाषांचे अध्ययन जपानमध्ये होते. जपानमध्ये जेवढे हिंदी जाणणारे आहेत तेवढे भारतात जपानी जाणणारे नाहीत.

१९४९साली चीनमधली यादवी माओत्सेटंगच्या बाजूने संपली. त्यावेळी भारताजवळ एशियातील सगळ्यात प्रबळ सैन्य होते. पण १९६२ साली म्हणजे अवघ्या १३वर्षात साऱ्या भारतीय सैन्याची एका आठवड्यात चटणी करण्याइतका चीन बलढय झाला.

**(डॉ. नी.र. वऱ्हाडपांडे हे एक सव्यसाची लेखक आहेत राजकारण, समाजकारण, साहित्य इ. विविध विषयांना त्यांच्या अभ्यासपूर्ण लेखनाने स्पर्श केला आहे. वसंतच्या वाचकांना त्यांच्या वैचारिक लेखनाचा परिचय झालाच आहे. सोप्यातला सोपा विषय कठीणातला कठीण करून सांगणाऱ्या प्राध्यापकी संप्रदायात ते कधीच समरस झाले नाहीत. उलट अवघड विषय सर्वसामान्य वाचकांना सहजरीत्या समजू शकेल अशा सहजगम्य शैलीने ते उलगडून दाखवू शकतात.**

**या पूर्वीच्या अशाच एका लेखात आमच्या तथाकथित इद्वानांना 'इंग्रजी'च्या बाबतीत कसे न्यूनगंडाने पछाडलेले आहे ते त्यांनी सप्रमाण सिद्ध करून दाखवले हे वाचकांना आठवत असेलच. -संपादक)**

यानंतर एकाच वर्षात चीनने अणुगोल व उदजनगोल केले हे करण्यासाठी त्याला अमेरिकेने व रशियाने देखील प्रतिकारक (reactor) व गुरूजल दिले नव्हते. उलट त्याने अणुशस्त्रे बनवू नयेत म्हणून त्याच्यावर जबरदस्त दबाव आणला गेला. रशियाने अणुकार्यक्रमास मदत केली नाही म्हणून त्याने आपल्या या कम्युनिस्ट गुरुंशी देखील दुजाभाव धरला. आमच्या प्रमाणे 'आम्हाला अणूशस्त्रे करायचीच नाहीत हो, आम्ही अहिंसावादी आहोत' म्हणून बड्या राष्ट्रांची मर्जी सांभाळण्याचा प्रयत्न चीनने केला नाही. 'तुम्ही मदत करा वा विरोध करा. आम्ही अणुशस्त्रे करणार!' अशी रोखठोक भूमिका घेतली.

यासर्व उपलब्धीमध्ये इंग्रजी भाषेचा काही सहभाग होता असे ऐकिवात नाही. यासंबंधी १९६०च्या सुमारास घडलेला एक प्रसंग आठवतो. Congrees for Cultural Freedom च्या कार्यालयात आम्ही मित्रमंडळी गप्पा मारत बसलो होतो. एका सद्गृहस्थाची टाइम्स ऑफ इंडियाच्या संपादकमंडळाचे सदस्य म्हणून ओळख करून देण्यात आली. तेव्हा मी त्यांना म्हटले.

'आपल्या वर्तमानपत्रात आज पहिल्याच पानावर एक शीर्षपङ्क्ति आहे.' सीमेवर भारताची कटकट अशीच सुरू राहिली तर आम्ही नेफामार्गे भारतात प्रवेश करू अशी चीनने धमकी दिली आहे. ही बातमी फार चिंताजनक आहे. सम्राट हर्षवर्धनाच्या मृत्यूनंतर चीनने याच मार्गाने भारतावर स्वारी केली होती.'

हे ऐकून संपादकमहाशय हसून म्हणाले.

'तुमची काळजी अनाठायी आहे. नेहरूंचा भारत हा काय सातव्या शतकातला इंग्रजी न जाणणारा मागसलेला भारत आहे? आमच्या इंग्रजीभाषी राष्ट्रासमोर 'हुंगसुंग' करणारे चीनी टिकणार आहेत काय? चीन्यांनाही हे माहीत आहे व ही पोकळ धमकी आहे.'

इतर सर्व मित्रमंडळी संपादकमहाशयाशी सहमत झाली व मी एक चिंतातुर जंतु ठरलो.

यानंतर एक वर्ष लोटण्याच्या आतच चीनने सांगितलेल्या मार्गानेच स्वारी केली. त्यावेळी चिन्यांच्या लुगसुंगपुढे आमचें यसफयस उजेड पाडू शकले नाही. इंग्रजीभाषी नेहरूंची इंग्रजाचा पाळीव कुत्रा म्हणून लुंगसुंगमध्येच माओत्सेंटंगने संभावना केली.

**चीनीभाषी भारत**

यावेळी आमच्या कार्यालयात एक वृत्त ऐकू येत होते ते असे:

चीन्यांनी कैद केलेला एक भारतीय अधिकारी आपल्या चीनी बांधवास म्हणाला.

'आम्ही एक इंग्रजीभाषी राष्ट्र आहोत हे तुम्ही लक्षात ठेवा.'

यावर तों चीनी अधिकारी म्हणाला.

'हे कशाला लक्षात ठेवायचे? तुम्ही लवकरच चीनीभाषी व्हाल'

'चीनशी आमची तुलना करू नका. चीनला आमच्यासारखे २००वर्षे पारतंत्र्यात रहावे लागले नव्हते' अशी वरील विवेचनावर प्रतिक्रिया होते. ब्रिटिश राज्य हे आमच्या प्रगतीस बाधक होते व आजही आहे' हे या तक्रारीत गृहीत आहे. ब्रिटिश राज्यामुळेच आमची प्रगति झाली नाही तर आम्ही मागासलेलेच राहिलो असतो असे म्हणणाऱ्यांना वरील समर्थनाचा आश्रय घेता येणार नाही.

तरी आजचा भारताचा अध:पात हा ब्रिटिश पारतंत्र्याचा परिणाम आहे काय याचा विचार होणे आवश्यक आहे.

असा विचार करण्याचा एक सोपा मार्ग उपलब्ध आहे. भारताची चीनशी तुलना न करता जे देश भारतासारखेच अंकित होते त्यांच्याशी भारताची तुलना करायची. अशा तुलनेत भारत व

हे देश यांच्यात जो फरक आढळेल त्या फरकाचे कारण ब्रिटिश राज्य आहे असा कांगावा करता येणार नाही.

१९४७ साली भारताबरोबरच पाकिस्तान, त्यावेळी पाकिस्तानात असलेला बंगलादेश, श्रीलंका व म्यानमार ही राष्ट्रे स्वतंत्र झाली. स्वतंत्र होण्याच्या वेळी भारताच्या व या देशांच्या प्रगतीत फारसा फरक नव्हता. या राष्ट्रांच्या तौलनिक प्रगतीचे ताजे आकडे येणेप्रमाणे-

भारतीय महाद्वीपातील राष्ट्रांच्या प्रगतीचा आलेख.

आकड्यावरून दिसून येईल की दरडोई उत्पन्नात भारताचा क्रमांक वरील नवस्वतंत्र देशात शेवटून पहिला आहे.

आयुर्मानात श्रीलंका व म्यानमार यांच्या खाली व पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्या किंचित् वर आहे. साक्षरतेत श्रीलंका व म्यानमार यांच्या खाली आहे.

१९५० साली विकासाचे उपर्युक्त तीन्ही मानदंड वापरून संयुक्त राष्ट्रांनी भारताचा क्रमांक ३२ वा ठरविला होता. तो घसरत घसरत १४६ झाला. गेल्या पाच वर्षात थोडा सुधारून १२७ झाला आहे.

माध्यम म्हणून इंग्रजीचा वापर केल्याशिवाय विज्ञानाचे शिक्षण व संशोधन शक्य होणार नाही अशी ओरड कानी कपाळी ऐकू येते. वस्तुत: आमची समज झापडलेली नसती तर चीन व जपान यांच्या उदाहरणाने या ओरडीचा खोटेपणा केव्हाच उघड झाला असता. पण आता चीन व जपान यांचे उदाहरण घेण्याचीही गरज उरली नाही.

**इंग्रजी आणि माहितीतंत्रज्ञान**

माहिती तंत्रज्ञांनी इतर क्षेत्राप्रमाणेच विज्ञानातही जगातील देशांचा क्रमांक लावला आहे यात विज्ञानावर होणारा खर्च व वैज्ञानिकांची संख्या यात भारताचा क्रमांक चौथा शोधनिबंधाच्या संख्येत अकरावा व शोधनिमंधाच्या गुणवत्तेत ७०वा आहे.

आजकाल इंग्रजी भाषेमुळे भारताची माहितीतंत्रज्ञानात अभूतपूर्व प्रगति झाली आहे. असे क्षणोक्षणी ऐकू येते. माहिती तंत्रज्ञानातही ५५देशांचे क्रमांक लावण्यात आले आहेत. त्यात भारताचा क्रमांक ५४वा व पाकिस्तानचा ५५वा आहे. पाकिस्तानच्या एक स्थान वर असणें ही फार मोठी उपलब्धी झाली असे ज्यांना वाटत असेल त्यांचे समाधान मी हिरावून घेऊ इच्छित नाही.

माहिती तंत्रज्ञानाच्या ज्या क्षेत्रात इंग्रजीमुळे भारताची प्रगति झाली आहे असे नेहमी सांगण्यात येते ते क्षेत्र संगणक कारकुनांचे आहे. टंकन, हिशेब, वर्गीकरण अकारविल्हे विभाजन, नोंदी वगैरे पूर्वी कारकुनाकरवी करविण्यात येणारी सर्व कामे आजकाल संगणक करतो. पण तो ती आपोआप करू शकत नाही. संगणंकाकडून काम कसे घ्यावे हे

| राष्ट्र | आयुर्मान | | | दरडोई उत्पन्न | साक्षरतेचे प्रमाण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्त्रिया | पुरूष | सरासरी | क्रमांक | स्त्रिया | पुरूष | सरासरी |
| भारत | ५८ | ५७ | ५७ | ९३ | ८३ | ६१ | ७२ |
| पाकिस्तान | ५७ | ५६ | ५६ | ७६ | १५ | ३६ | २५ |
| बंगलादेश | ५४ | ५५ | ५४ | ९१ | २३ | ४५ | ३४ |
| म्यानमार | ६१ | ५७ | ५९ | उपलब्ध नाही | ७१ | ८५ | ७८ |
| श्रीलंका | ७४ | ६८ | ७१ | ६६ | ८३ | ९० | ८६ |

शिकावे लागते. पण हे यंत्रचालकाचे काम आहे. वैज्ञानिकाचे काम नाही. त्यातले जे प्रोग्रामिंगचे म्हणजे रीतिलेखनाचे काम आहे ते केवळ यंत्रचालकाचे काम नसून त्याहून अधिक बुध्दिमत्तेचे आहे. पण तरी घरबांधणीचा व धरणयोजनेचा आराखडा तयार करणे वा रोगचिकित्सा करणे यापेक्षा अधिक मौलिकतेचे ते काम नाही.

हे काम करणाऱ्या भारतीयांना अमेरिकेत पुष्कळ नोकऱ्या मिळतात कारण हे काम करण्यास अमेरिकन कर्मचारी जेवढा पगार घेतो तेवढा भारतीय कर्मचारी निदान तृतीयांश स्वस्त असतो.

संगणकयुगाने दुसरी सोय अशी झाली आहे की स्वस्त मजुराकडून काम घेण्यास त्या मजुराला आपल्या देशात आणण्याची जरूर नाही. कारकुनीचे सारे काम कागदावर होऊ शकते व कागदावरचा मजकूर संगणकामुळे एका क्षणात अमेरिकेहून भारतात व भारताहून अमेरिकेत पाठवता येतो. त्यामुळे भारतीय संगणक कर्मचाऱ्यांना अमेरिकेत बोलावण्याची जरूर नाही. अमेरिकन उद्योजक भारतातील कर्मचाऱ्यांना संगणकावरूनच भारतात काम पाठवितात व भारतीय कर्मचारी त्यावर केलेले काम संगणकावरूनच अमेरिकेस परत करतात. ही देखील स्वस्त मजुरांची निर्यातच आहे.

स्वस्त मजुरांची निर्यात हे प्रगतीचे लक्षण नाही. पारतंत्र्य उरावर बसले तेव्हापासूनच स्वस्त भारतीय मजुरांचे तांडे कधी स्वेच्छेने तर कधी बळजबरीने आफ्रिका, पश्चिम व आग्नेय आशिया येथे नेण्यात आले. असे मजूर काबाडकष्टाचे काम करोत वा पांढरपेशे काम करोत, भारतात माणूस स्वस्थ आहे याचे ते प्रतीक आहे. प्रगतीचे प्रतीक नाही.

'प्रगतीचे लक्षण असो वा नसो, हजारो लोकांना इंग्रजीमुळे रोजी मिळते ना?' असे यावर विचारण्यात येते.

**माहिती तंत्रज्ञान व इंग्रजीते भाषा**

काही हजार लोकांना कारकुनाचे काम मिळण्यासाठी आमचा सारा राज्यकारभार व सारे शिक्षण इंग्रजीतून झाले पाहिजे व पहिल्या वर्गापासून इंग्रजी शिकविले पाहिजे अशी समजूत ज्या देशात आहे त्या देशात विचारशक्ति आहे असे म्हणणे कठिण आहे. भारताइतके नसले तरी चीनमधले मजूर देखील स्वस्त आहेत व माध्यम म्हणून चीनच्या ऐवजी इंग्रजीचा कुठेही वापर न करता वाढत्या संस्थेने अशी मजुरी मिळवू लागले आहेत. ते केवळ अमेरिकेकडूनच मजुरी न मिळविता जपानकडून देखील अशी कामे मिळवतात. जपानचा संगणक उद्योग ८७ अब्ज डॉलरांचा आहे. जपानी उद्योजक 'जपानी येत नसेल तर तुम्हाला आमच्या उद्योगात स्थान नाही' असे भारतीयांना सांगू लागले आहेत.

जपानव्यतिरिक्त संगणक क्षेत्रात पहिल्या १० मध्ये मोडणारे साऊथ कोरिया, जर्मनी, रशिया, फ्रान्स, चीन व इटली हे सात देश आहेत. त्यांच्या भाषा येणारे लोक भारतात असले तर त्यांनाही या देशांच्या संगणक क्षेत्रात मजुरी मिळू शकते. तात्पर्य इंग्रजीशिवाय जगात महत्वाच्या भाषाच नाहीत या प्रचारामुळे इंग्रजी व्यतिरिक्त इतर जागतिक महत्वाच्या भाषा जाणणारा वर्गच या देशात नाही. इंग्रजीपूजेमुळे संगणक क्षेत्रातल्या नोकऱ्या हे माफक उद्दीष्ट साधण्यात देखील आमची हानीच झाली आहे. आपण शाळातून इंग्रजी अजिबात काढून टाकले असते व विद्यापीठीय स्तरावर इंग्रजी, चीनी, जपानी, स्पॅनिश, रशियन, जर्मन, फ्रेंच व इटालियन या आठ भाषांपैकी कोणतीही एक निवडून तिचे पूरक भाषा म्हणून अध्ययन करण्याची व्यवस्था केली असती तर संगणकीय नोकऱ्यांच्या दृष्टीने देखील आमचा फायदाच झाला असता.

जगाची लोकसंख्या ६०० कोटींची आहे. या ६००कोटी लोकांपैकी फक्त ५० कोटी लोक इंग्रजी समजू शकतात. तेव्हा इंग्रजी एके इंग्रजी केल्याने आपला जगाशी संपर्क साधला असे समजून समाधान मानणे अज्ञतेवे आहे. अमेरिकेंत देखील पीएच्.डीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी व्यतिरिक्त एक जागतिक भाषा शिकावी लागते. अशा जागतिक भाषात हिंदीचाही समावेश आहे. हल्ली अमेरिकेत अरब देशात चालू असलेल्या आतंकवादाशी झगडण्यासाठी अरबी जाणणाऱ्या तरूणांची आवश्यकता भासू लागली आहे. त्यासाठी खास अभ्यासक्रमांचे आयोजन करून ती भागविली जात आहे. ब्रिटनमध्ये महाराष्ट्रात धर्मप्रसारासाठी जाणाऱ्या मिशनऱ्यांची सोय करण्यासाठी ऑक्स्फर्डमध्ये मराठी शिक्षणाची सोय आहे. श्रीलंकेमध्ये देखील याचप्रमाणे खास अभ्यासक्रमांचे आयोजन करून अमेरिकेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची सोय करण्यात आली आहे. त्यासाठी पहिल्या वर्गापासून इंग्रजी, इंग्रजीत शिक्षण व इंग्रजीत राज्य यांची श्रीलंकेला जरूर वाटली नाही.

नुकताच "Confederation of Indian Industry and World Econoic Forum:ICT Blue Print" भारतीय उद्योगसंघ व जागतिक अर्थमंच याचा माहिती उद्योगाबद्दल एक नील आलेख प्रकाशित झाला आहे. त्यात खालील उद्गार आहेत.

Few IT companies have invested in creating their own intellectual property Soon Indian IT will be competing with lower cost countries. This is not a sustainble proposition Important makets like France, Germany, Japan and China are not yet tapped'

याचा सारांश असा की भारतीय माहिती उद्योगाने स्वत:ची स्वतंत्र छाप पडेल असे काही केले नाही व असे काही केले नाही तर हा उद्योग दरिद्री राष्ट्रापुरताच मर्यादित राहील. इंग्रजी भाषा राष्ट्रांच्या बाहेर असलेल्या विशाल क्षेत्रात भारतीय माहिती उद्योगाला प्रवेश करता आला नाही.

भारतात 'भारतीय भाषा मुर्दाबाद व इंग्रजी जिन्दाबाद' हा कार्यक्रम मोठ्या जोमाने राबविला जात असताना भारताची प्रगति न होता अध:पात झालेला आहे. हे आतापर्यंत दिलेल्या आकड्यांनी स्पष्ट व्हावे. उलट इंग्रजीचे उच्चाटन करण्यात श्रीलंकेने या

महाद्वीपातील सर्व देशात आघाडी मारली आहे. सुमारे ४०वर्षापूर्वीच श्रीलंकेत नोकरी मिळविण्यासाठी इंग्रजी अनिवार्य नाही असे वृत्त झळकले होते. असे असून श्रीलंका वरील सर्व देशात सर्व क्षेत्रात पुढे आहे.

बांगलादेश १९७१ पर्यंत पाकिस्तानचाच भाग होता 'बांगला देशात उर्दू वापरण्याचे काही कारण नाही. आमची भाषा बंगाली आहे.' अशी बंगला देशीयांनी भूमिका घेऊन. पाकिस्तानशी संघर्ष केला. भारतातील कोणत्याही भागात नाही एवढे स्थान बंगलादेशात स्वभाषेला म्हणजे बंगालीला आहे. बंगालीला हे स्थान भारतातील बंगालमध्ये मिळू शकलेलं नाही.

माझे एक मित्र बंगालमध्ये वस्तीस जाण्यापूर्वी बंगाली शिकले व बंगाली लोकांना बरे वाटेल म्हणून त्यांच्याशी बंगालीत बोलू लागले. तेव्हा तुम्ही टागोरांच्या भाषेत बोलता, हे बंगाली नाही अशी त्यांची संभावना करण्यात आली. माझे एक बंगाली मित्र मला म्हणाले. 'मला टिळकांच्या गीतारहस्याचे बंगाली भाषान्तर करायचे आहे.' मी आश्चर्याने विचारले, 'अहो गीतारहस्याच्या मराठी आवृत्तीत गीतारहस्याचा बंगाली अनुवाद १९२४सालीच प्रकाशित झाल्याचे लिहिले आहे. मग आता तुम्ही पुन: कसला अनुवाद करणार?' यावर ते म्हणाले, 'तो अनुवाद टागोर बंगालीत आहे, मी आधुनिक बंगालीत अनुवाद करणार आहे. आधुनिक बंगाली कशी असते हे मी विचारले तेव्हा त्याने गीतारहस्याच्या बंगाली भाषांतरातील एक वाक्य व स्वत: संकल्पिलेल्या भाषांतरात ते कसे होईल हे म्हणून दाखविले. मूळ भाषांतरात मराठी गीतारहस्यातले संस्कृत शब्द जसेच्या तसे ठेवले होते व त्याच्या जोडीला मराठीतील संस्कृतेतर शब्दांच्या जागी देखील संस्कृत प्रयोग केलेला होता!

एकूण भारतातील बंगालीमध्ये महाराष्ट्रासारखीच स्वभाषेची विटंबना सुरू आहे.

तात्पर्य, इंग्रजीपूजक भारत हा भारतीय महाद्वीपात देखील एक सर्वात मागासलेला देश आहे. मग साऱ्या जगाचा विचार केला तर विचारायलाच नको.

यावर पुन: मेरे मुरगीकी टांग या न्यायाने इंग्रजीप्रेमी उद्गारतात इंग्रजीची साथ धरूनही भारताची प्रगति झाली नाही याची इतर कारणे आहेत. एक तर लोकशाही. लोकशाहीत दहा तोंडे दहा दिशांना! मग प्रगति कशी होणार? शिवाय वाढत्या लोकसंख्येचा बोजा!'

अमेरिकेंससारख्या प्रगत लोकशाही देशात जाऊन नरसिंहरावांनी देखील आपल्या अवनतीचे खापर लोकशाहीवर फोडले. लोकशाहीने अवनति होत असेल तर अमेरिका हा जगातील सगळ्यात अवनत देश राहिला असता.

भारतीय महाद्वीपात सगळ्यात जास्त प्रगति करणाऱ्या श्रीलंकेत लोकशाही नांदत आहे.

लोकशाहीविरूध्दचा मोर्चा ढासळल्यावर 'आमची बेसुमार लोकसंख्या हे आमच्या पायातले लोढणे आहे' असे रडगाणे गाण्यात येते. चीनमध्ये लोकशाही नसल्यामुळे. तेथे दर एकराला भारताच्या चौपट लोकसंख्या असतानाही लोकसंख्येचा भस्मासूर त्याच्या आड आला नाही' असा इंग्रजीचे वकील बचाव देतात. पण श्रीलंकेमध्ये उपजाऊ जमिनीच्या दर एकराला भारताच्या तिप्पट लोकसंख्या असताना लोकशाहीचा अव्हेर न करता तिने प्रगति केली याची उपपत्ती इंग्रजीदासांना देता येणार नाही.

वस्तुत: लोकशाही प्रगतिविरोधी असते काय?' या मुद्यांचा संयुक्त राष्ट्रांच्या तज्ज्ञांनी विचार करून असा निष्कर्ष काढला आहे की लोकशाहित एखाद्या प्रतिभाशाली हुकूमशहाने केलेल्या प्रगतीइतकी भपकेदारही प्रगति होणे कठीण असली तरी हुकूमशहाकडून अनेकवार होणाऱ्या कोट्यवधी लोकांना संकटाच्या खाईत लोटणाऱ्या चुका देखील होत नाहीत व त्यामुळे एकंदरीत हुकूमशाहीपेक्षा लोकशाहीचा जास्त प्रगतिकारक असते.

उघड सत्य हे आहे की ज्या लोकांना आपल्याच देशात आपली भाषा वापरणे शक्य वाटत नाही. ते लोक कोणत्याही क्षेत्रात काही प्रगति करू शकतील असा संभव नाही.

***